संपादक- श्री.प्रकाश संपत आरगडे

Website : bhagweswarajyanews.in

PRGI NO- MAHMAR/26/A7292

साप्ताहिक

भगवे स्वराज्य

शब्द सत्याचे, विचार स्वराज्याचे

वर्ष : १ अंक: ४ मुंबई, शुक्रवार २५ सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२६ पाने- ८ किंमत-२/- रू.

'ज्ञानेश कुमार हे सर्वात मोठे देशद्रोही'

⏭ ४८ तासांत राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलन

⏭ सीजेपीच्या अभिजीत दिपकेंची घोषणा

■ नवी दिल्ली

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी आता निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर हल्लाबोल केला आहे. "ज्ञानेश कुमार हे सर्वात मोठे देशद्रोही आहेत. त्यांनी तत्काळ राजीनामा द्यायला हवा. भारताच्या लोकशाहीला त्यांनी सर्वात मोठा धोका निर्माण केला आहे. ज्ञानेश कुमार निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त झाल्यानंतर ते ठरवत आहेत की, कोणी मतदान करायचे आणि कोणी करायचे नाही. ही लोकशाही आहे का? त्यांनी पूर्ण लोकशाही उलथवून लावली आहे", असा घणाघाती आरोप करत अभिजीत दिपके यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे.

पुढच्या ४८ तासांत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास कॉक्रोच जनता पार्टी देशव्यापी आंदोलन





सुरू करेल. दिल्लीतून आम्ही या आंदोलनाची सुरूवात करू, अशी घोषणा अभिजीत दिपके यांनी केली.

अभिजीत दिपके यांनी पुढे बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काय केले याची माहिती दिली. "महाराष्ट्र, उत्तर प्रदेशमध्ये दोन कोटींहून अधिक मतदार हटवले आहेत. पश्चिम बंगालमधील ९० लाख लोकांना मतदान करू दिले नाही. दिल्लीत ४७ लाख मतदार वगळले जात आहे. केरळमध्ये २४ लाख, तमिळनाडूत ९७ लाख, कर्नाटकमध्ये १ कोटी, तेलंगणात ७३ लाख मतदार वगळले जात आहेत. सर्व राज्यांची आकडेवारी एकत्र केल्यास १३ कोटींहून अधिक मतदारांचा हक्का हिरावला जात आहे", असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रादेशिक पक्षांची एकजुट होत असल्याचे सरकारच्या लक्षात आले. त्यामुळे एक एक करून प्रादेशिक पक्षांच्या मुख्यमंत्र्यांना पराभूत केले गेले. हा योगायोग असू शकत नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जीच्या मतदारसंघात ५० हजार मते हटवली गेली, त्यांचा पराभव झाला, तमिळनाडूमध्ये एमके स्टॅलिन, दिल्लीत अरविंद केजरीवाल, केरळमध्ये पिनराई विजयन सत्तेतून पायउतार झाले. एसआयआरमधून तत्कालीन मुख्यमंत्र्यांना कमकुवत केले गेले का? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

विरोधकांशी किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी आमचे देणेघेणे नाही, असेही अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केले. पण लोकशाहीमध्ये जर विरोधकांना संपवून टाकले तर ती लोकशाही उरेल का? २०१५ सालीदेखील मध्यप्रदेश, गोवा, कर्नाटकमध्ये रातोरात सरकार उलथवण्यात आले होते. आमदार, खासदार विकत घेऊन भाजपाचे मन भरले नाही म्हणून प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पाडली गेली. शिवसेना, तृणमूल काँग्रेस याचे उदाहरण आहे, असा आरोप आहे.

खाद्यतेल आयात शुल्क कपात

ग्राहकांना फायदा होणार अथवा नाही याचे उत्तर गुलदस्त्यात

■ नवी दिल्ली

खाद्यतेलाच्या वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने सोयाबीन, पाम आणि सूर्यफूल तेलाच्या आयातीवरील मूलभूत सीमा शुल्कात कपात केली. अर्थ मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार हे बदल आजपासून लागू झाले. कच्च्या सोयाबीन व पाम तेलावरील शुल्क १० टक्क्यांवरून ५ टक्के, तर कच्च्या सूर्यफूल तेलावरील शुल्क १० टक्क्यांवरून शून्य करण्यात आले.

रिफाइंड सोया व पाम तेलाचे शुल्क ३२.५ वरून २७.५ टक्के, तर रिफाइंड सूर्यफूल तेलाचे २२.५ टक्के करण्यात आले आहे. त्याचा फायदा ग्राहकांना नेमका कधी, किती होणार याचे उत्तर गुलदस्त्यात आहे.

या निर्णयाचा तात्काळ परिणाम आयातदार आणि रिफायनर्सच्या खर्चावर होईल, ग्राहकांच्या किंमती लगेच त्याच प्रमाणात कमी होतीलच असे नाही. जुन्या, जास्त शुल्कावर आयात केलेल्या साठ्याचा निपटारा झाल्यानंतर आणि कमी शुल्काचा नवीन माल बाजारात आल्यानंतर परिणाम दिसण्याची शक्यता आहे.

देशात २३ सप्टेंबरला सरासरी किरकोळ किंमत सोया तेलाची १६६.८७ रुपये, सूर्यफूल तेलाची १९४.२६ रुपये आणि पाम तेलाची १५३.८९ रुपये प्रति किलो होती. मागील शुल्क कपातीवेळी सरकारने कंपन्यांना लाभ ग्राहकांपर्यंत पोचवण्याचे निर्देश दिले होते आणि नंतर रिफायनरींच्या एमआरपी व वितरक किमतींची तपासणी केली होती.

भाजपच्या संघटनेत मोठी बदल

महाराष्ट्रातील दोन नेत्यांवर उत्तर प्रदेशची धुरा

■ मुंबई

भारतीय जनता पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक पातळीवर मोठे फेरबदल केले आहेत. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी विविध राज्यांसाठी प्रभारी आणि सहप्रभारींची नवी यादी जाहीर केली आहे. या फेरबदलामुळे महाराष्ट्रातील काही नेत्यांना राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची जबाबदारी मिळाली आहे.

भाजपने २८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रभारी आणि सहप्रभारी नियुक्त केले आहेत. आगामी काळात निवडणुका होणाऱ्या राज्यांमध्ये संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने या नियुक्त्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्याची जबाबदारी महाराष्ट्रातील नेत्यांकडे सोपवण्यात आल्याने भाजपच्या राष्ट्रीय संघटनात्मक रणनीतीत महाराष्ट्राच्या नेत्यांना मिळणारे महत्त्वही अधोरेखित झाले आहे.

महाराष्ट्रासाठीही भाजपने स्वतंत्र टीम जाहीर केली आहे. बैजयंत जय पांडा यांची महाराष्ट्राच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत अमित मालवीय, सदानंद शेठ तानावडे आणि कमलजीत सहरावत यांच्यावर सहप्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने उत्तर प्रदेश भाजपसाठी महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे तेथील संघटनात्मक कामकाज, पक्षातील समन्वय



आणि निवडणूक तयारीसाठी अनुभवी नेत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या नव्या यादीत महाराष्ट्रातील नेत्यांचा समावेश विशेष चर्चेचा विषय ठरला आहे.

महाराष्ट्रातील माजी मंत्री आणि खासदार विनोद तावडे यांची उत्तर प्रदेशच्या प्रभारीपदी, तर राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांची उत्तर प्रदेशच्या सहप्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच उत्तर प्रदेशची संघटनात्मक जबाबदारी महाराष्ट्रातील या दोन नेत्यांवर सोपवण्यात आली असून, भाजपच्या नव्या राष्ट्रीय टीममध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.



अनंत चतुर्दशीला महामार्गावर जड वाहनांना 'नो एंट्री'

२५ सप्टेंबरला सायंकाळी ४ पासून मिरवणुका संपेपर्यंत निर्बंध

प्रतिनिधी
■ वसई

अनंत चतुर्दशीच्या दिवशी होणाऱ्या गणेश विसर्जनामुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर होणारी संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन पालघर जिल्हा प्रशासनाने जड आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरते निर्बंध घातले आहेत. गुरुवारी २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून गणेश विसर्जनाच्या मिरवणुका संपेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत.

गणेश विसर्जनासाठी मोठ्या संख्येने भाविक रस्त्यावर उतरत असल्याने महामार्गासह शहरातील प्रमुख मार्गांवर वाहनांची कोंडी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गृह शाखेकडून वाहतूक नियंत्रणाबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. ठाणे पोलिस आयुक्त तसेच मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या सूचनेनुसार ही उपाययोजना करण्यात आली आहे.

या निर्बंधांमुळे गुजरातकडून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या जड-अवजड वाहनांना महामार्गावर काही काळ थांबावे लागणार आहे. विशेषतः घोडबंदर, वसई, ठाणे, मुंबई आणि नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

वाहनचालकांनी या कालावधीत शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा. तसेच प्रशासनाने निश्चित केलेल्या सुरक्षित ठिकाणी वाहने थांबवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. चारोटी टोलनाका ते मनोरदरम्यान महामार्गालगत असलेली हॉटेल्स, ढाबे, पेट्रोलपंप आणि उपलब्ध सुरक्षित पार्किंगच्या ठिकाणी जड वाहने काही काळ उभी करता येणार आहेत.

दरम्यान, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलिस वाहने, अत्यावश्यक सेवांची वाहने तसेच गणेश विसर्जन व्यवस्थेशी संबंधित वाहनांना या निर्बंधातून आवश्यकतेनुसार सूट देण्यात आली आहे.

गणेश विसर्जन मिरवणुका कोणत्याही अडथळ्याविना पार पडाव्यात आणि महामार्गावर वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी ही वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. वाहनचालकांनी या कालावधीत प्रशासन आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

विजांच्या कडकडाटासह ग्रामीण वसईत पाऊस

पावसाच्या प्रतीक्षेतील गर्वार पिकांना दिलासा

प्रतिनिधी
■ वसई

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर वसईच्या ग्रामीण भागात पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. विशेषतः पाण्याची गरज असलेल्या गर्वार पिकांसाठी हा पाऊस फायदेशीर ठरणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतातील पिकांना पाण्याची गरज भासू लागली होती. त्यामुळे आणखी काही दिवस पाऊस लांबल्यास पिकांवर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत होती. अशातच ग्रामीण पट्ट्यात काही ठिकाणी जोरदार तर काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. विजांच्या कडकडाटासह बरसलेल्या या पावसामुळे जमिनीला आवश्यक ओलावा मिळाला असून शेतीच्या कामांनाही काही प्रमाणात गती मिळण्याची शक्यता आहे.

पावसामुळे ग्रामीण भागातील वातावरणातही बदल जाणवू लागला आहे. दिवसभराच्या उकाड्यानंतर रात्री थंड वारे वाहत असल्याने नागरिकांना गारवा अनुभवायला मिळत आहे. येत्या काही दिवसांत पावसाने आणखी हजेरी लावल्यास गर्वार पिकांना त्याचा चांगला फायदा होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

दुसरीकडे, ग्रामीण भागात पाऊस बरसत असताना वसईच्या शहरी भागातील अनेक ठिकाणी मात्र पावसाने पाठ फिरवली आहे. शहरात दिवसभर उकाडा जाणवत असून नागरिकांना पावसाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे सध्या ग्रामीण भागात पाऊस आणि गारवा तर शहरी भागात उकाडा असे वेगवेगळे चित्र पाहायला मिळत आहे.

WRWWO द्वारे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी अखिल भारतीय निबंध, चित्रकला स्पर्धेचे आयोजन



प्रतिनिधी
■ मुंबई

वेस्टर्न रेल्वे वुमेन्स वेल्फेअर ऑर्गनायझेशन (WRWWO) च्या कार्यकारी समितीने अनुक्रमे १३ आणि २० सप्टेंबर २०२६ रोजी वेस्टर्न रेल्वेच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी निबंध स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. चर्चगेट येथील वेस्टर्न रेल्वेच्या मुख्यालयात या दोन्ही स्पर्धांमध्ये सुमारे २०० मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला.

वेस्टर्न रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, निबंध आणि चित्रकला स्पर्धा वेस्टर्न रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आल्या होत्या. या उपक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळाला; मुलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि आपली उच्च दर्जाची सर्जनशीलता व कल्पकता सादर केली.

WRWWO च्या कार्यकारी सदस्यांनी मुलांच्या सहभागाचे आणि त्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले. कौतुकाची पावती म्हणून, सर्व सहभागींना लेखन-साहित्य (स्टेशनरी) देण्यात आले. हा उपक्रम रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मुलांची सर्जनशीलता, गुणवत्ता आणि सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्याबाबतच्या WRWWO च्या निरंतर कटिबद्धतेचे दर्शन घडवतो.

अतुल जंगम परिमंडळ 1 मधील नगर पथविक्रेता समितीच्या सदस्यपदी

मुंबई - महाराष्ट्र हॉकर संघ संलग्न – भारतीय मजदूर संघाचे अतुल सतीशचंद्र जंगम यांची बृहन्मुंबई महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती, परिमंडळ–१ च्या वेंडिंग कमिटी सदस्यपदी नियुक्ती झाली आहे. पालिका उपायुक्त व परिमंडळीय नगर पथविक्रेता समितीच्या अध्यक्षा चंदा जाधव यांनी अशासकीय संघटना प्रतिनिधी म्हणून (सदस्यपदी) नियुक्ती केली आहे. परिमंडळ–१ अंतर्गत A, B, C, D व E प्रभागांतील पथविक्रेत्यांच्या प्रश्नांसाठी, त्यांच्या हक्कांसाठी आणि योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची ही जबाबदारी मी कृतज्ञतेने स्वीकारत असल्याचे अतुल जंगम यांनी सांगितले.



ससूनवघर-बापाणे येथील पादचारी पुलांचा मार्ग अखेर मोकळा

▸ जीव मुठीत घेऊन महामार्ग ओलांडण्यापासून होणार सुटका ▸ भूमिपुत्र फाउंडेशनच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील ससूनवघर आणि बापाणे येथे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पूल उभारण्यास अखेर मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे वेगवान वाहनांच्या गर्दीतून जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडणाऱ्या स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या दोन्ही ठिकाणी पादचारी पूल व्हावेत, यासाठी भूमिपुत्र फाउंडेशनचे अध्यक्ष सुशांत श्रीकांत पाटील यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

ससूनवघर आणि बापाणे परिसरातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाहनांची सतत वर्दळ असते. मात्र महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वस्ती असल्याने स्थानिक नागरिकांना दैनंदिन कामांसाठी वारंवार महामार्ग ओलांडावा लागतो. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगारांना भरधाव वाहनांमधून वाट काढताना अपघाताचा धोका पत्करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र पादचारी पुलांची गरज सातत्याने व्यक्त केली जात होती.

या पार्श्वभूमीवर भूमिपुत्र फाउंडेशनने हा प्रश्न भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह संबंधित यंत्रणांकडे मांडला होता. दोन्ही ठिकाणची परिस्थिती लक्षात आणून देत पादचारी पूल उभारण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर ससूनवघर आणि बापाणे येथे पादचारी पुलांना मंजुरी मिळाल्याने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

पादचारी पूल प्रत्यक्षात उभारल्यानंतर नागरिकांना महामार्गावरील भरधाव वाहतुकीतून रस्ता ओलांडण्याची गरज कमी होणार असून अपघातांचा धोकाही कमी होण्यास मदत होणार आहे. मात्र मंजुरी मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष कामाला किती लवकर सुरुवात होते, याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, केवळ मंजुरीपुरता हा विषय मर्यादित न राहता दोन्ही पुलांची कामे तातडीने सुरू करून ती निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, अशी मागणी सुशांत पाटील यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरू केलेला पाठपुरावा पूल प्रत्यक्ष वापरात येईपर्यंत सुरूच ठेवणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

रस्ते अपघात रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करा

13 व्या राज्य रस्ता सुरक्षा परिषदेच्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील रस्ते अपघात आणि अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य तसेच संबंधित यंत्रणांनी अधिक समन्वयाने काम करावे. अपघात नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, रस्ता सुरक्षा लेखापरीक्षण आणि अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश परिवहन मंत्री तथा राज्य रस्ता सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले.

मंत्री श्री. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात 13 व्या राज्य रस्ता सुरक्षा परिषदेची बैठक झाली. या परिषदेस सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठ, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, परिवहन, साखर आयुक्त कार्यालय, गृह तसेच वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

'पीएम-राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी

अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये तातडीने उपचार मिळावेत यासाठी 'पीएम-राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. या योजनेंतर्गत प्रति व्यक्ती दीड लाख रुपयांपर्यंत, कमाल सात दिवसांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. अपघातग्रस्ताला रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचार सुरू करण्यास विलंब होऊ नये, तसेच पोलीस नोंदणी, डिजिटल ओळख क्रमांक आणि उपचार मंजुरीची प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी आरोग्य, पोलीस आणि परिवहन विभागाने एकत्रित कार्यपद्धती विकसित करावी, असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.



- 'गोल्डन अवर'मध्ये अपघातग्रस्तांना तातडीने उपचार
- रस्ता सुरक्षा लेखापरीक्षण आणि एकात्मिक रुग्णवाहिका यंत्रणेवर भर

108 व खासगी रुग्णवाहिका एकाच डिजिटल मंचावर

अपघातस्थळी सर्वांत जवळची उपलब्ध रुग्णवाहिका तातडीने पोहोचण्यासाठी 108 सेवा आणि खासगी रुग्णवाहिकांना एका एकात्मिक डिजिटल मंचावर आणण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले. रुग्णवाहिकांमध्ये कॅमेरा व दूरसंचार सुविधा उपलब्ध करून अपघातग्रस्ताची स्थिती रुग्णालयातील डॉक्टरांना पाहता यावी आणि रुग्णालयात पोहोचेपर्यंत आवश्यक उपचारांबाबत मार्गदर्शन करता यावे, याचाही विचार करण्याबाबत मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

राज्यातील ट्रॉमा केअर सेंटरसाठी मनुष्यबळ, वैद्यकीय उपकरणे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपलब्धतेच्या दृष्टीने तपासणी करून प्रत्येक 50 किलोमीटरच्या परिसरात सक्षम ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. समृद्धी महामार्ग, द्रुतगती मार्ग, सागरी मार्ग तसेच दुर्गम भागांसाठी हवाई रुग्णवाहिका सेवेचे धोरण तयार करण्याबाबतही सूचना त्यांनी केली.

रस्ता सुरक्षा लेखापरीक्षणाला प्राधान्य

रस्त्यांचे नियोजन, बांधकाम आणि देखभालीच्या प्रत्येक टप्प्यावर नियमित रस्ता सुरक्षा लेखापरीक्षण करावे. रस्ता पायाभूत सुविधांमधील अभियांत्रिकी त्रुटी दूर करून अपघातांचा धोका कमी करण्यासाठी हे लेखापरीक्षण महत्त्वाचे असल्याचे मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतील 10 टक्के निधी रस्ता सुरक्षेसाठी राखीव ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

अपघातांची वेळ, ठिकाण, वाहनाचा वेग, रस्त्याची रचना, प्रकाशव्यवस्था, पादचारी वाहतूक आणि चालकाची स्थिती यांचे शास्त्रीय विश्लेषण करून 'ब्लॅक स्पॉट्स'वरील उपाययोजना वेगाने पूर्ण कराव्यात. महामार्ग परिसरातील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविणे आणि महामार्ग गस्त पथके अधिक सक्षम करण्याचे निर्देशही देण्यात आले.

मोबाईलचा टॉर्च लावून अंत्यविधी आटोपण्याची रहिवाशांवर वेळ

मुंबई - मुंबई महापालिकेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करूनही जोगेश्वरी पूर्वेतील प्रतापनगर येथील कै. राजेश्वर वामन रागिनवार हिंदू स्मशानभूमीच्या नागरी समस्या गेल्या काही महिन्यापासून 'जैसे थे'च असल्याचे दिसून येत आहे.या स्मशानभूमीत सामान्य नागरिकांना अंत्यविधी करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अंत्यविधीच्या ठिकाणी वीजच नसल्यामुळे मोबाईलची टॉर्च लावून विधी करावा लागल्याचा प्रकार या स्मशानभूमीत रविवारी रात्री साडे दहाच्या दरम्यान घडला. पालिकेच्या ढिसाळ नियोजनाचा आणि प्रशासकीय असंवेदनशीलतेचा एक अत्यंत विदारक प्रकार जोगेश्वरी पूर्व परिसरात घडला आहे. ज्या ठिकाणी शोकाकुल अवस्थेते नागरिक आपल्या व्यक्तीला अखेरचा निरोप देण्यासाठी येतात, त्याच स्मशानभूमीत शवदहनासाठी विजेची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना चक्क मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात अंत्यविधी उरकावे लागत आहेत. जोगेश्वरी स्मशानभूमीतील वीज पुरवठा मागील आठवड्यापासून खंडित असूनही प्रशासनाकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आली नव्हती. अखेर मृतदेहाची विटंबना टाळण्यासाठी उपस्थित नागरिकांनी आपापल्या मोबाईलचे टॉर्च आणि बॅटऱ्या पेटवून त्या अंधुक प्रकाशात अंत्यविधीचे सोपस्कार पूर्ण केले.

श्रीगणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापौर तावडे यांच्याकडून घाटकोपर मेट्रो स्थानकाची पाहणी



प्रतिनिधी
■ मुंबई

श्रीगणेशोत्सवाच्या काळात मुंबईत नियमित प्रवाशांसोबतच भाविक आणि पर्यटकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन, मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी घाटकोपर मेट्रो स्थानकाला काल प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. सण आणि उत्सव काळात मुंबईकरांचा आणि मुंबईत येणाऱ्या पाहुण्यांचा प्रवास सुकर, सुरक्षित व गतिमान व्हावा या उद्देशाने महापौरांनी मेट्रो स्थानकावरील संपूर्ण सुविधा आणि व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली आणि प्रवाशांशी थेट संवाद साधला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान महापौर रितू तावडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने घाटकोपर मेट्रो स्थानक परिसरात पुरवल्या जाणाऱ्या विविध नागरी सेवा-सुविधा, स्वच्छता, आरोग्य व्यवस्था आणि आपत्कालीन रुग्णवाहिका सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यासोबतच, मेट्रो प्रशासनाच्या वतीने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या दैनंदिन सुविधा आणि एकूणच मेट्रो प्रवासाच्या अनुभवाविषयी महापौरांनी प्रवाशांशी आस्थेने चर्चा केली. प्रवाशांनी मांडलेली मते, सूचना आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, नागरिकांच्या प्रवासाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी प्रशासनाने तत्काळ सकारात्मक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना महापौरांनी दिल्या.

त्याचप्रमाणे, महापौरांनी मेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध तांत्रिक व व्यवस्थापकीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने श्रीगणेशोत्सवादरम्यान आणि एरवी गर्दीच्या (पीक अवर्स) वेळेत केले जाणारे गर्दी नियंत्रण, मेट्रोचे संचालन आणि नियोजन, दैनंदिन प्रवासी संख्या, तिकिटांचे सध्याचे दर, तसेच प्रवाशांच्या वाढत्या गर्दीला सामावून घेण्यासाठी भविष्यात मेट्रो कोचेसची संख्या वाढविण्याची योजना याबाबत माहिती जाणून घेतली. मेट्रोच्या महसूल उत्पन्नाचे विविध मार्ग आणि त्यामध्ये शाश्वत वाढ करण्यासाठी मेट्रो प्रशासनाने केलेले नियोजन या विषयांवरही महापौरांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

प्रवाशांशी थेट संवाद साधून नागरी सुविधांचा घेतला सविस्तर आढावा

मेट्रो प्रशासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन यांच्यामध्ये अधिक समन्वय साधण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य पुरवले जाईल, असे महापौरांनी यावेळी मेट्रो प्रशासनाला आश्वस्त केले. या पाहणीप्रसंगी मेट्रोचे व्यवसाय प्रमुख अजय कुमार, उपमहाव्यवस्थापक मयंक रावत, वरिष्ठ व्यवस्थापक अल्पेश नागदा यांच्यासह मेट्रोचे अल्पेश नागदा यांच्यासह मेट्रोचे संबंधित तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाचे सहाय्यक आयुक्त जयदीप मोरे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र हांगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

धनुष्यबाणाचा निर्णय पुन्हा लांबणीवर

■ मुंबई

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार वर्षांपासून चर्चेत असलेल्या शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीला पुन्हा ब्रेक लागला आहे. मंगळवारी या प्रकरणावर सुनावणी होऊ शकली नाही. बुधवारीही हे प्रकरण युक्तिवादासाठी न्यायालयासमोर आले नाही. त्यामुळे अंतिम निर्णयासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

शिवसेना पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह कोणाचे, यावर निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०२३ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाच्या बाजूने निर्णय दिला होता. आयोगाने शिंदे गटाला 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह दिले. या निर्णयाला उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

या प्रकरणाची अंतिम सुनावणी सप्टेंबरमध्ये पुन्हा सुरू झाली. शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन केले. पक्षाची संघटनात्मक रचना, पक्षाची घटना आणि विधिमंडळातील बहुमत यांसारख्या बाबींचा विचार करण्याचा अधिकार आयोगाला असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. त्याला ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी विरोध केला आहे.

दरम्यान, १६ आणि १७ सप्टेंबरच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णय प्रक्रियेबाबत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. दोन्ही गटांना 'धनुष्यबाण' हे आरक्षित चिन्ह न देता स्वतंत्र निवडणूक चिन्हांवर निवडणूक लढण्याचा पर्याय आयोगाने विचारात घेतला होता का, अशी विचारणा न्यायालयाने केली. आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न प्रलंबित असताना विधिमंडळातील बहुमताच्या आधारे निर्णय घेण्याबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले.

मात्र, या आठवड्यात सुनावणीसाठी न्यायालयीन वेळ मिळत नसल्याने प्रकरण पुढे सरकलेले नाही. बुधवारीही दुसऱ्या महत्त्वाच्या प्रकरणाच्या सुनावणीमुळे शिवसेना प्रकरणावर युक्तिवाद होऊ शकला नसल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयाकडून या प्रकरणासाठी नवीन तारीख निश्चित होण्याची प्रतीक्षा आहे.

त्यामुळे सध्या 'धनुष्यबाण' ठाकरे गटाकडे जाणार की शिंदे गटाकडेच राहणार, याचा अंतिम फैसला झालेला नाही. या आठवड्यात सुनावणीची शक्यता कमी असून, पुढील आठवड्यात या प्रकरणाला पुन्हा वेळ मिळतो का, याकडे आता महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. अंतिम निकालासाठी मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दुष्काळ पाहणी दौऱ्यावरून वडेट्टीवारांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

शेतकऱ्यांच्या भेटीसाठी मेटल डिटेक्टर कशाला?

■ मुंबई

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवरून राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावर काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्याऐवजी सत्ताधारी केवळ प्रसिद्धीसाठी दौरे करत असल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत देण्याऐवजी कॅमेऱ्यांसमोर देखावा उभा केला जात असल्याचेही वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात जळालेली पिके टेबलावर ठेवून करण्यात आलेल्या छायाचित्रणावरही वडेट्टीवार यांनी आक्षेप घेतला. शेतकऱ्यांच्या संकटाचे प्रदर्शन मांडण्याऐवजी त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी



ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. दुष्काळ पाहणीच्या नावाखाली शेतकऱ्यांचे दुःख विकले जात असल्याचा आरोप करत त्यांनी अशा प्रकारांना महाराष्ट्राच्या मातीचा आणि बळीराजाचा अपमान ठरवले.

शेतकऱ्यांच्या भेटीसाठी सुरक्षा तपासणीच्या व्यवस्थेवरूनही वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना भेटण्यासाठी मेटल डिटेक्टर लावण्याची गरज काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना गुन्हेगारासारखी वागणूक दिली जात असल्याचा आरोप करत, जनतेला भेटतानाही मुख्यमंत्री घाबरत असल्याची टीका त्यांनी केली.

दरम्यान, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांवर ठेवण्याऐवजी तातडीने मदत मिळणे गरजेचे असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. कॅमेऱ्यांसमोरचे फोटोसेशन आणि कोरडी आश्वासने थांबवून राज्य सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करावा आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

गणेश विसर्जन सोहळ्याचे भव्य स्वरूप परदेशी पर्यटकांना अनुभवता येणार -पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

■ मुंबई

अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील ऐतिहासिक गिरगाव चौपाटी येथे होणाऱ्या भव्य गणेश विसर्जन सोहळ्याचा अनुभव परदेशी पर्यटकांना घेता यावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाद्वारे विशेष दालन उभारण्यात येणार आहे. या विशेष दालनाच्या माध्यमातून परदेशी पर्यटकांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, गणेशोत्सवाचे ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्व तसेच विसर्जन सोहळ्याचे भव्य स्वरूप जवळून अनुभवता येणार आहे अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, "समृद्ध सांस्कृतिक परंपरा हे राज्याच्या पर्यटनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील विविध सांस्कृतिक परंपरा आणि उत्सवांचा आंतरराष्ट्रीय पर्यटकांना परिचय करून देण्याच्या दृष्टीने पर्यटन विभागाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गणेशोत्सवासारख्या लोकसहभागातून साजऱ्या होणाऱ्या उत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख परदेशी पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन देऊन सांस्कृतिक पर्यटनाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटनवाढीस चालना देण्यात येत आहे." गणेश विसर्जनाचा हा भव्य सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यटक गिरगाव चौपाटी येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यांना गणपती मिरवणुकीचे दर्शन घेण्याबरोबरच गणरायाची पूजा, आरती आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि भक्तिमय वातावरणामध्ये पर्यटकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडणार आहे. मुंबईतील गणेशोत्सवाला लाभलेली व्यापक लोकसहभागाची परंपरा, विविध गणेश मंडळांची सजावट, मिरवणुका आणि विसर्जन सोहळा यामुळे या उत्सवाला विशेष वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे.

पश्चिम रेल्वेवर गर्दीचा ताण कमी होणार तीन महत्त्वाच्या स्थानकांवर नव्या फलाटांची तयारी

■ मुंबई

मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उभारण्याची तयारी रेल्वे प्रशासनाने केली आहे. बोरिवली, अंधेरी आणि विरार या तीन प्रमुख स्थानकांवर नव्या फलाटांची निर्मिती करण्याचे नियोजन असून, त्यामुळे प्रवाशांची गर्दी विभागण्यास मदत होणार आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत लोकल पकडताना आणि स्थानकातून बाहेर पडताना होणारी धावपळ कमी करण्याच्या दृष्टीने या कामांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

पश्चिम रेल्वेवरील महत्त्वाचे जंक्शन असलेल्या बोरिवली स्थानकात दोन नवीन फलाट उभारण्याची योजना आहे. यातील एक फलाट बोरिवली ते विरारदरम्यानच्या पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिकेच्या प्रकल्पाशी संबंधित असेल. तर दुसरा फलाट हार्बर मार्गिकेचा बोरिवलीपर्यंत विस्तार करण्यासाठी दक्षिणेकडील बाजूस उभारण्यात येणार आहे. या दोन्ही फलाटांची लांबी सुमारे ३३० मीटर आणि रुंदी सात मीटर असेल. त्यामुळे भविष्यात वाढणाऱ्या लोकल वाहतुकीसाठी स्थानकाची क्षमता वाढविण्यास मदत होणार आहे.

विरार स्थानकातही पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या प्रकल्पांतर्गत अतिरिक्त फलाट उभारण्यात येणार आहे. विरार हे पश्चिम रेल्वेवरील उपनगरीय वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र असल्याने या ठिकाणी फलाटांची



क्षमता वाढविणे आवश्यक मानले जात आहे. नव्या फलाटामुळे लोकल गाड्यांच्या संचालनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल. तसेच भविष्यात वाढणाऱ्या प्रवासी संख्येच्या दृष्टीनेही या सुविधेचा उपयोग होणार आहे. अंधेरी स्थानकात गर्दीच्या वेळेत प्रवाशांची मोठी कोंडी होते. विशेषतः फलाट क्रमांक नऊवर लोकलमधून उतरणाऱ्या प्रवाशांना पादचारी पूल आणि अरुंद जिन्यांचा वापर करावा लागतो. ही अडचण कमी करण्यासाठी १२ डब्यांच्या लोकलसाठी नवीन फलाट उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सहाव्या मार्गिकेच्या बाजूला उत्तरेकडील दिशेला हा फलाट उभारला जाणार असून, दोन्ही बाजूंनी प्रवाशांना बाहेर पडता येईल, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे गर्दीच्या वेळेत प्रवाशांची होणारी कोंडी कमी होण्यास मदत होईल.

पश्चिम रेल्वे मार्गावर उपनगरीय लोकल आणि लांब पल्ल्याच्या मेल-एक्स्प्रेस गाड्या एकाच मार्गिकांवरून धावत असल्याने अनेकदा वाहतुकीचे नियोजन करताना अडचणी निर्माण होतात. पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही प्रकारच्या रेल्वे वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे लोकल गाड्यांना लांब पल्ल्याच्या गाड्यांमुळे होणारे अडथळे कमी होतील. याचा परिणाम गाड्यांच्या वेळापत्रकावर आणि वक्तशीरपणावरही होण्याची अपेक्षा आहे.

या पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय वाहतुकीची क्षमता वाढविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेषतः विरारपर्यंत धावणाऱ्या लोकल सेवांमध्ये दररोज सुमारे ३० ते ४० अतिरिक्त फेऱ्यांची भर पडण्याची शक्यता रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे. बोरिवली, अंधेरी आणि विरार येथील नव्या फलाटांची उभारणी तसेच पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचा विस्तार पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना अधिक लोकल उपलब्ध होण्याबरोबरच स्थानकांवरील गर्दीचे व्यवस्थापन करणेही सोपे होणार आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने या प्रस्तावित कामांकडे लक्ष लागले आहे.

सेवा संकल्प अभियान अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरण - कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह

मुंबई

'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान राज्यभर पात्र महिला शेतकऱ्यांची नोंदणी व प्रमाणपत्र वितरण करण्यात येत आहे अशी माहिती कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी दिली. राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते.या वेबिनारमध्ये महिला शेतकरी प्रमाणपत्राची पात्रता, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ग्रामसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका तसेच प्रमाणपत्राच्या आधारे उपलब्ध होणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. वर्ष २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे होत असताना, महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळावी आणि विविध शासकीय योजनांचा सुलभ लाभ मिळावा, यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी अधिनियमाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे व प्रमुख वैशिष्ट्यांची माहिती दिली. शेतीची व्यापक व्याख्या करण्यात आली असून, महिला प्रत्यक्ष शेती किंवा शेतीपूरक कार्यात सहभागी असल्यास तिची 'शेतकरी' म्हणून ओळख अधोरेखित करण्यात आली आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ग्रामसभेने संबंधित महिला शेतीमध्ये कार्यरत असल्याचे निश्चित केल्यानंतर १५ दिवसांत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अर्ज नाकारल्यास त्याची लेखी माहिती देण्यात येईल आणि १२० दिवसांत अपीलाची संधी उपलब्ध राहणार आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या आधारे बियाणे, खते, कृषी निविष्ठा, अवजारे, कर्ज, पीक विमा तसेच PMFME, CMFME आदी योजनांचा लाभ घेता येणार आहे. एकही पात्र महिला शेतकरी या सुविधेपासून वंचित राहू नये, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन सिंह यांनी केले.



ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत ग्रामपंचायत आणि ग्रामसभांची भूमिका महत्वाची असल्याचे सांगितले. अर्ज ग्रामसेवक किंवा कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडे सादर करता येणार असून, प्राप्त अर्जांची यादी ग्रामसभेसमोर ठेवून चर्चा व ठरावाद्वारे संबंधित महिलेला शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येणार आहे. महिला बचत गट, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक तसेच गटविकास अधिकाऱ्यांनी गावातील पात्र महिलांना प्रमाणपत्राचे महत्व व त्याचे लाभ समजावून सांगून अर्ज करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे. प्रत्येक पात्र महिला शेतकरी या प्रक्रियेत सहभागी होईल आणि जिल्हा व तालुकास्तरावर १०० टक्के कार्यवाही पूर्ण होईल, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. पुलकुंडवार यांनी केले. 'उमेद' अभियानाशी जोडलेल्या पात्र महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांनी केले. ग्रामसखी, कृषीसखी, पशुसखी, CRP तसेच कृषी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे विविध कृषी योजना, अनुदाने व शासकीय लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होणार असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला आणि 'लखपती दीदी'च्या उद्दिष्टपूर्तीस चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालिका मीनल करणवाल यांनी महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख देण्याचा हा उपक्रम प्रकल्पाच्या माध्यमातून व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. जमीनधारक तसेच भूमिहीन महिला आणि कुक्कुटपालन, मत्स्यपालन, दुग्धव्यवसाय आदी शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांनाही प्रमाणपत्राचा लाभ मिळणार आहे.

प्रमाणपत्रामुळे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील DBT अंतर्गत २२ घटकांसह कृषी अवजारे बँक आणि ॲग्रो प्रोसेसिंग युनिटच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. प्रकल्पांतर्गत ७ हजार २०१ गावांमध्ये पात्र महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी सक्रियपणे कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेबिनारला कृषिताई, कृषीसखी, 'उमेद' अभियानातील प्रतिनिधी, ग्रामसेवक, सरपंच, गटविकास अधिकारी, कृषी विभागातील अधिकारी-कर्मचारी, बचत गट, शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच पात्र महिला शेतकरी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख, शासकीय योजनांपर्यंत सुलभ पोहोच आणि विविध कृषी सुविधांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यातील पात्र महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

दुष्काळसदृश्य परिस्थितीचा मत्स्यव्यवसायावर परिणाम

प्रत्यक्ष पाहणीवर आधारित अहवाल तातडीने सादर करा -मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई

राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'दुष्काळ ट्रिगर-१' मध्ये मोडणाऱ्या तालुक्यांतील मत्स्य तलाव, जलाशय व संबंधित जलस्रोतांची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. प्रत्येक जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीची अचूक माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावी, तसेच मत्स्यव्यवसायावर होणाऱ्या परिणामाची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणावी, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा मत्स्यव्यवसाय क्षेत्रावर होणारा परिणाम लक्षात घेता, संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून दुष्काळाची तीव्रता तसेच मासेमारी करताना येणाऱ्या अडचणींची माहिती संकलित करावी. मत्स्य तलाव आणि संबंधित जलस्रोतांची सद्यस्थिती प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे नोंदवून त्याचा अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी दिले.



दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे मत्स्यव्यवसाय क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांसाठी विभागाने तत्परतेने कार्यवाही करावी. मच्छिमारांच्या उपजीविकेवर होणारा परिणाम, जलस्रोतांमधील पाणीसाठ्याची स्थिती आणि मत्स्य उत्पादनावर होणारे परिणाम याबाबतची माहिती अचूकपणे संकलित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

अपुरा पाऊस आणि त्यामुळे निर्माण झालेला अपुरा पाणीसाठा याचा परिणाम मत्स्यबीज संचयन आणि मत्स्योत्पादनावर होत आहे. मत्स्यबीज उत्पादन केंद्रांमध्येही आवश्यकतेनुसार उत्पादनावर परिणाम होत असल्याने ग्रामीण रोजगार आणि मत्स्योत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ट्रिगर-१ मध्ये येणाऱ्या तालुक्यांतील जलस्रोतांची प्रत्यक्ष स्थिती आणि मत्स्यव्यवसायावरील परिणामाची अचूक माहिती संकलित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे मत्स्यव्यवसाय करणे अडचणीचे ठरत असल्याने मच्छिमारांच्या उपजीविकेवर होणाऱ्या परिणामाचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी विभागाने तयार राहावे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी संकलित केलेली माहिती जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून त्यामध्ये आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीस मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, मत्स्यव्यवसाय आयुक्त भानुदास पालवे तसेच सर्व संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

पाऊस ओसरला, पण तहान वाढली

राज्यातील शेकडो गावांना आता टँकरचाच आधार

मुंबई

पावसाळ्याचा अंतिम टप्पा सुरू असतानाही राज्यातील काही भागांमध्ये पाणीटंचाईचे संकट कायम आहे. स्थानिक जलस्रोत आटल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. परिणामी प्रशासनाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये टंचाईची तीव्रता वाढताना दिसत आहे.

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यातील ३६२ गावे आणि १ हजार ३५४ वाड्यांना ४११ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत टँकरवरील अवलंबित्व वाढले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार गावांची संख्या ५६ ने, तर वाड्यांची संख्या २१४ ने वाढली असून टँकरची संख्याही ६८ ने वाढली आहे.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६६ गावे आणि १४ वाड्या, जालना जिल्ह्यात १२ गावे आणि ९ वाड्या, तर बीड जिल्ह्यात ५६ गावे आणि ६८ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत बीड जिल्ह्यात टँकरवर अवलंबून असलेल्या गावांची संख्या वाढल्याचे चित्र आहे.

उत्तर महाराष्ट्रातही काही भागांमध्ये टंचाई कायम आहे. नाशिक जिल्ह्यातील १८ गावे आणि ३७ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दुसरीकडे धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यांमध्ये टँकरची गरज नसल्याची नोंद आहे. त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता तुलनेने कमी असल्याचे दिसून येते.

अहिल्यानगर जिल्ह्यात पाणीटंचाईचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आकडेवारीतून दिसते. जिल्ह्यात १११ गावे आणि ५९९ हून अधिक वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात ४२ गावे आणि २८० वाड्या, सांगली जिल्ह्यात २६ गावे आणि सुमारे १७० वाड्या, तर सोलापूर जिल्ह्यात ७७ गावे आणि ३३८ वाड्या अद्याप टँकरवर अवलंबून आहेत.

दरम्यान, कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये सध्या टँकरची गरज भासलेली नाही. विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्येही सध्या टँकरची नोंद झालेली नाही.

राज्यात सध्या ४१८ गावे आणि १ हजार ५६८ वाड्या पाणीटंचाईच्या झळा सोसत असून, या भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तब्बल ४७९ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. पावसाळा संपत असतानाच टँकरची वाढलेली संख्या ही ग्रामीण भागातील पाणीस्थिती अद्याप गंभीर असल्याचे चित्र स्पष्ट करते.

दुष्काळाशी लढताना निधी कमी पडू देणार नाही - मुख्यमंत्री

■ धाराशिव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर तालुक्यातील करजखेडा येथे थेट शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.कोरडा पडलेला साठवण तलाव आणि नुकसानग्रस्त पिकांची अवस्था पाहिल्यानंतर परिस्थिती गंभीर असली तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये.दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. कुठेही निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही.राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे,अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकरी बळी भोसले यांच्या शेताच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त ऊस आणि सोयाबीन पिकांची बारकाईने पाहणी केली. पेरणी कधी केली,पिकाला किती पाऊस मिळाला,पावसाचा खंड किती काळ राहिला आणि त्याचा पिकाच्या वाढीवर व संभाव्य उत्पादनावर काय परिणाम झाला, याची माहिती त्यांनी शेतकऱ्यांकडून घेतली.सोयाबीनचे पीक पूर्णपणे हातचे गेले असून उसाची वाढही खुंटल्याचे त्यांनी नमूद केले.पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून दिसत असल्याचे सांगत शेतकऱ्यांना शासनाकडून सरसकट मदत केली जाईल,असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री थेट बांधावर आल्याने परिसरातील शेतकरीही त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी पुढे आले. पावसाच्या खंडामुळे झालेले नुकसान,उत्पादनातील संभाव्य घट,हंगामासाठी केलेली गुंतवणूक आणि त्याचा कुटुंबाच्या अर्थकारणावर होणारा परिणाम त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. पावसाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांनी ऐकून घेतल्या.मुलांचे शिक्षण बंद पडणार नाही आणि अडचणीच्या काळात शेतकरी कुटुंबांना आवश्यक आधार देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील,अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आता उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे काटेकोर नियोजन करावे लागणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. सध्याच्या परिस्थितीत पिके वाचविणे कठीण झाले आहे.त्यामुळे उपलब्ध पाणी सर्वप्रथम पिण्यासाठी राखून ठेवावे लागेल.पिण्याच्या पाण्याची गरज भागविल्यानंतर पाणी उपलब्ध राहिल्यासच त्याचा अन्य कारणांसाठी वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले.

पुढील चार ते पाच महिने कठीण असून या काळातून सर्वांना एकमेकांना धीर देत आणि सहकार्य करत मार्ग काढावा लागेल,असेही त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन सर्व आघाड्यांवर पावले उचलत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,पीक कर्जमाफीचे काम सुरू आहे.पीक कापणीचे प्रयोगही सुरू असून पीक विम्याची मदत दिली जाईल. पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल.रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता असल्यास त्यादृष्टीनेही तयारी केली जाईल. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना राबविताना निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी आणि वीजबिल माफीचा निर्णय घेण्यात आला असून आता थेट आर्थिक मदतही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शेतीचे उत्पन्न हातचे गेल्यामुळे शेतकरी कुटुंबांना अन्नधान्याची कमतरता भासणार नाही,यासाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. पीक नुकसान,पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा,पीक विमा, आर्थिक मदत आणि अन्नधान्य अशा सर्व पातळ्यांवर शासन नियोजन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. करजखेड्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट संवाद साधला.संकट मोठे आहे मात्र आपण सर्वजण एकमेकांना धीर देऊन आणि एकजुटीने त्यातून मार्ग काढू.शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पालकमंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील,आमदार बसवराज पाटील, राणाजगजितसिंह पाटील व अभिमन्यू पवार,माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 39 नवनियुक्त सहायक आयुक्त व जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण

■ मुंबई

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या सामाजिक न्याय विभागातील ३९ नवनियुक्त सहायक आयुक्त व जिल्हा समाजकल्याण अधिकारी (गट-अ) यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, समाज कल्याण अतिरिक्त आयुक्त सुरेंद्र पवार, खाजगी सचिव नितेश भंडारे, विभागाचे सहसचिव सो.ना. बागूल यांच्यासह मंत्रालय व समाज कल्याण आयुक्तालय, पुणे येथील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या जनसेवेच्या प्रवासास समर्पित 'सेवा संकल्प अभियान' राज्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सेवा, समर्पण आणि संकल्प या भावनेतून प्रशासकीय यंत्रणेने अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने कार्य करण्याचा संदेश देण्यात येत आहे. याच



पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय विभागात नव्याने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

नवनियुक्त अधिकाऱ्यांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. समाजातील वंचित, दुर्बल, पीडित, दलित तसेच दिव्यांग घटकांच्या आशा-आकांक्षा आणि शासनाच्या कल्याणकारी योजना यांच्यामध्ये सामाजिक न्याय विभाग महत्वाचा दुवा म्हणून काम करतो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर कार्यरत अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविताना अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता, पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठा जपावी. कार्यालयीन कामकाजासोबतच क्षेत्रीय स्तरावर प्रत्यक्ष भेटी देऊन योजनांची अंमलबजावणी, लाभार्थ्यांच्या अडचणी आणि योजनांच्या परिणामकारकतेचा आढावा घ्यावा. प्रशासन आणि लाभार्थी यांच्यातील दुवा अधिक सक्षम करून नागरिकांना शासनाच्या योजनांचा सुलभतेने लाभ मिळेल, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना भावी प्रशासकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता, गतिमानता आणि लोकाभिमुखता आणणे ही काळाची गरज आहे. सर्वसामान्य नागरिक हा प्रशासनाच्या केंद्रस्थानी असला पाहिजे. विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ पोहोचविण्यासाठी अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे. सामाजिक न्याय विभागाची प्रतिमा अधिक सक्षम करण्यासाठी नवनियुक्त अधिकाऱ्यांनी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

क्षेत्रीय कामकाजाला प्राधान्य देण्याचे आवाहन

समाज कल्याण विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुरेंद्र पवार यांनी ३० वर्षांच्या प्रशासकीय सेवेतील अनुभव नवनियुक्त अधिकाऱ्यांसमोर मांडला. सामाजिक न्याय विभागाचे काम हे केवळ कार्यालयीन स्वरूपाचे नसून त्याला प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाची जोड असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करणे यासाठी क्षेत्रीय अनुभव महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नवनियुक्त अधिकाऱ्यांना मिळालेली नियुक्ती ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याची संधी आहे. त्यामुळे शासनाच्या योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचविताना नियमांची प्रभावी अंमलबजावणी, लाभार्थीकेंद्रित दृष्टिकोन आणि उत्तरदायित्वाची भावना जपण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

आभार सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव बागूल यांनी मानले. यावेळी सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय तसेच समाज कल्याण आयुक्तालय, येथील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय

सरकार-जीवी स्वायत्त !

''निवडणूक आयोगात दुभंग'' हे ते वृत्त. या तीन सदस्यीय निवडणूक आयोगाच्या दोन सदस्यांनी गेल्या काही महिन्यात अनेक विषयांवर आपली मतभिन्नता नोंदवली आणि मुख्य निवडणूक आयुक्तांकडून त्यास काहीच प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर केंद्रीय मंत्रिमंडळाचा दरवाजा ठोठावण्याची वेळ या दोन सदस्यांवर आली. ही मतभिन्नता निवडणूक आयोगातर्फे हाती घेण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेसंदर्भात प्राधान्याने आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून मतदार याद्यांतील समावेशाविषयीच्या अर्जात या दोन निवडणूक आयुक्तांच्या संमतीविना बदल कसे केले गेले असाही प्रश्न यातून उपस्थित होतो.

निवडणूक आयोगाच्या बेपर्वा आणि मनमानी कार्यशैलीविषयी इतके दिवस फक्त बोललेच जात होते आणि त्या आयोगाच्या वर्तनातून त्यास पुष्टी मिळत होती. तथापि या वृत्ताने कथित स्वायत्त आयोगाच्या उरल्या-सुरल्या अब्रूची लक्तरे पूर्णपणे चव्हाट्यावर आणली असून त्यामुळे लज्जारक्षणापुरते काही शोधण्याची वेळ या घटनात्मक यंत्रणेवर आली आहे. देशाचा निवडणूक आयोग इतका बे-आबरू आतापर्यंत कधी झाला नव्हता. ते श्रेय नि:संशय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचे. ते त्यांच्या पारड्यात पुरेपूर घालून आता या वृत्तानंतर जे झाले वा होत आहे त्याविषयी.

पहिला मुद्दा या वृत्तानंतरच्या घटनांत. निवडणूक आयोग ही स्वतंत्र, स्वायत्त घटनात्मक यंत्रणा. तिच्या बचावार्थ भाजपच्या वाक्वीरांनी मैदानात उतरण्याची काय गरज? निवडणूक आयुक्तांचे दौर्बल्य वैधानिक मुद्द्यांवर दिसले असेल/नसेल. पण आयोग मुखदुर्बल निश्चितच नाही. त्यांचा तो बचाव करण्यास सक्षम असेलच. तरी भाजपस तो करण्याची गरज का वाटते? केंद्रीय गुन्हा अन्वेषण विभागावर आरोप झाला? भाजप समर्थन करणार.

सक्तवसुली संचालनालयावर (ईडी) टीका झाली? बचावार्थ आहेच भाजप. बाजारपेठ नियंत्रक 'सेबी'च्या कार्यशैलीवर कोणी आक्षेप घेतले? उत्तर भाजप देणार. आताही तेच. हे काय सुरू आहे? निवडणूक आयोगातील दुभंग चव्हाट्यावर आणणाऱ्या या वृत्तांतात आयोगाविषयी, त्यातही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यशैलीविषयी, काही अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यास थेट उत्तर देण्याऐवजी निवडणूक आयोग स्वसमर्थनार्थ काहीतरी गोलमाल बचाव करतो आणि भाजप मात्र त्यांच्या वतीने हिरिरीने मैदानात उतरतो हे काय दर्शवते? या संपूर्ण वृत्तात भाजपवर काहीही आरोप नाही की त्या पक्षाचा उल्लेख नाही. तेव्हा ज्ञानेशकुमार यांच्या नावे जाळलेल्या मिरच्या भाजप नेतृत्वाच्या नाकास का झोंबाव्यात? भाजपची मदत ज्ञानेश कुमारांनी मागितली होती काय? मागितली असेल तर का, आणि नसेल तर मग भाजपची ही स्वयं-सेवा काय दर्शवते?

दुसरा प्रश्न ज्ञानेश कुमार यांच्या दोन सहकारी आयुक्तांच्या पत्रातील महत्त्वाच्या मुद्द्याबाबत. सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी हे अन्य दोन निवडणूक आयुक्त मतदार यादी नोंदणी प्रक्रियेच्या केंद्रीकरणास विरोध करतात; त्याबाबत. गोवा राज्यातील मतदार याद्यांबाबत ही बाब प्रथम इतकी स्पष्टपणे दिसून आली. निवडणूक आयोगाच्या तेथील अधिकाऱ्यांनी सर्व ती छाननी केल्यानंतर काही मतदारांची नावे मतदार यादीत पुन्हा समाविष्ट करण्यास मान्यता दिली. या मतदारांविषयीचे सर्व आक्षेप फेर पडताळणी प्रक्रियेत दूर झाले. त्यानंतर गोव्यातील स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांनी ही नावे यादीत पुन्हा समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी झाला.

स्थानिक निवडणूक अधिकारी तसे का करू शकले नाहीत, यामागील कारण अत्यंत गंभीर आहे. ते असे की मतदार याद्यांत नाव समाविष्ट करण्याची संगणकीय प्रक्रिया संपूर्णपणे आयोगाच्या दिल्ली मुख्यालयात केंद्रीभूत करण्यात आल्याचे हे दोन निवडणूक आयुक्त म्हणतात. हे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याखेरीज अन्य कोणी करूच शकत नाही. तसे ते त्यांनी केले असेल तर त्यामुळे मतदार यादी प्रक्रियेत मूलगामी बदल होणार असून तो करण्याचे अधिकार मुख्य निवडणूक आयुक्तांस आहेत काय? ते देण्याबाबत आवश्यक घटनादुरुस्ती वा नियम-बदल केंद्र सरकारने केव्हा केले? या 'बदलां'मुळे राज्य वा मतदारस्तरीय निवडणूक आयोग प्रमुख वा अधिकारी या पदाचे अवमूल्यन होऊन हा अधिकारी वर्ग केवळ सांगकाम्या कारकून ठरतो. राज्याराज्यांतील यंत्रणेस हे मान्य आहे काय? भाजप-शासित राज्ये या 'बदलां'स नंदीबैलाप्रमाणे होकार देतीलही. पण इतका मोठा बदल करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक आयुक्तांस मुदलात आहे काय?

तिसरा मुद्दा आयोगाच्या खुलाशाबाबत. ''आमच्यात मतभेद नाहीत'', ''आम्ही तिघे एकत्र एकदिल'' वगैरे भंपक खुलासा हा आयोग करतो. तो त्यांना करावाच लागेल. ते समजून घेता येईलही. पण ज्ञानेश कुमारेतर अन्य दोन आयुक्तांनी आयोगाच्या कामकाजाविरोधात थेट केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवांचा दरवाजा ठोठावला होता, त्याचे काय? मंत्रिमंडळ सचिव हे प्रशासनाचे प्रमुख असतात.

निवडणूक आयोग हा शासकीय प्रशासनाचा भाग आहे काय? असेल तर तो तसा कधी झाला? नसेल तर मग मंत्रिमंडळ सचिवाकडे दाद मागण्याची गरज या दोन आयुक्तांस का वाटली? मंत्रिमंडळ सचिवांनी त्यास कसा प्रतिसाद दिला? आपले दोन सहकारी आपल्या विरोधात मंत्रिमंडळ सचिवाकडे औपचारिक तक्रार करत असतील तर त्यावर ज्ञानेश कुमार यांनी काही तरी मत व्यक्त केलेच असेल. ते काय? आयोगाच्या आजच्या 'मिले सुर मेरा तुम्हारा' खुलाशात यावर काहीच कसे भाष्य नाही? खरे तर या मुद्द्यावरही आयोगाची बाजू स्पष्ट करण्याची जबाबदारी भाजपने घ्यायला हवी होती. पण या आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्यावर आयोग आणि त्याचा पाठीराखा भाजप दोघेही मौन बाळगत असतील तर त्यातून काय ध्वनित होते?

निवडणूक आयोग-नामे घटनात्मक यंत्रणेचे वस्त्रहरण करणारे हे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर सरकारच्या 'मांडीवरील माध्यमे' खडबडून कामाला लागली. आयोगाच्या तीन सदस्यीय आयोगातील हे मतभेद हे कसे खऱ्या लोकशाहीचे लक्षण आहे वगैरे पोपटपंची हे माध्यम-राघू करताना दिसतात. ते त्यांच्या वकुबाप्रमाणेच म्हणायचे. पण यातही मुद्दा असा: आयोगाच्या तीनपैकी दोन सदस्यांनी गेल्या १० महिन्यांत १४ वेळा जर आपले आक्षेप/मतभेद लेखी नोंदले असतील तर त्या लेखी आक्षेपांस मुख्य निवडणूक आयुक्तांनी लेखी उत्तर दिले असेल. तसे ते देणे अपेक्षित आहे. त्या उत्तरांतून या आक्षेपांचे/मतभेदांचे निराकरण झाले असणार आणि त्यामुळे या दोघांचे समाधानही झाले असणार. कारण त्यानंतर हे सगळे निर्णय 'बहुमता'ने घेतले गेले. तसे असेल तर मग आयोगाने या शंकांचे निरसन करणारा पत्रव्यवहार वा खुलाशाच्या नोंदी खुल्या कराव्यात.

ज्ञानेश कुमार तसे करत नसतील तर आयोग-रक्षणकर्त्या भाजपने त्यांना ते तसे करण्यास भाग पाडावे. त्यामुळे सगळाच प्रश्न मिटेल. मात्र यात एक छोटीशी मेख आहे. ती अशी की आयोगासंदर्भातील २०२३ च्या कायद्यानुसार आयोगाचे सर्व निर्णय हे शक्य तितक्या एकमताने; एकमत न झाल्यास बहुमताने घेतले जाणे अपेक्षित आहे. पण दहा महिन्यांत किमान १४ वेळा या आयोग सदस्यांनी विरोध नोंदवूनही त्याची दखलच घेतली न जाणे याला काय म्हणणार? इतके दिवस निवडणूक आयोग सरकारची 'शाखा' असल्यासारखा वागतो, असा आरोप होत होता. आता तो सत्ताधारी पक्षाची 'शाखा' असल्यासारखे वागत असल्याची टीका होईल. ती अस्थानी नसेल. अशा या सरकार-जीवी स्वायत्त यंत्रणेविरोधात आता सर्व विरोधी पक्षीयांनी एकत्र येऊन रस्त्यावर उतरावे. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणाची दखल घेतली नाही तर तोच एक मार्ग उरतो.

फुकटेगिरीसाठी राजमार्ग!

रोखीचे म्हणजेच नगदी व्यवहार बंद करा. सर्व व्यवहार यूपीआय द्वारे म्हणजे 'युनिफाईड पेमेंट इंटरफेस' द्वारे करा, यासाठी गेल्या काही वर्षांपासून सरकारकडून भिन्नभिन्न युक्त्या वापरल्या गेल्या. या पेमेंट पद्धतीचा मोठा गाजावाजा करण्यात आला होता, यूपीआय द्वारे दिलेल्या किंवा चुकत्या केलेल्या पैशावर पूर्वी कोणताही अन्य खर्च होत नव्हता. त्यामुळे देणारे आणि येणारे दोघेही अगदी मजेत होते पण आता सरकार दोन हजार रुपयांच्या वर व्यवहार करणाऱ्यांकडून 0.4% या दराने शुल्क वसुली करणार आहे. सरकारला अशा वेगवेगळ्या प्रकारे सामान्य जनतेच्या खिशातून वसुली करायची आहे हे यातून स्पष्ट दिसते आहे. प्रश्न आहे तो म्हणजे, रोख रकमेऐवजी मोबाईल टू मोबाईल अशा सुविधाजनक मार्गाचा वापर करणाऱ्यांच्या बाबतीत सरकारने हा निर्णय घेतल्यावर त्याचा विरोध करण्यासाठी देशातील सर्व जनता सामील झालेली आहे. काही वर्षांपूर्वी नोटबंदी करण्यात आली, त्याला काळाबाजार रोखण्याचे साधन असे गोंडस नाव देण्यात आले होते. पण काळाबाजार काही थांबला नाही, त्यानंतर अनेक वस्तूंवरती जीएसटी लावून सरकारने त्यामध्ये दरमहा हजारो कोटींवरून लाखो कोटींपर्यंत मजल मारली. त्यातच सरकारने गेल्या संसदेत अजिबात गाजावाजा न करता शुल्क आकारण्याचे विधेयक संमत करून टाकलेले होते. दोन हजार रुपयांपर्यंत शुल्क नाही मग इतर व्यवहारांवर हा भुर्दंड दंड का, असा जनतेच्या मनातील सवाल आहे. हा व्यवहार खरे तर रोखी सारखाच असतो. त्यासाठी कुणालाच खर्च येत नाही, एका क्लिकवर सर्व व्यवहार होतात. या सोयीमुळे बँकातून रोकड काढणे आणि नगदी खर्च करणे यावर आता उपभोक्त्यांचा आणि बँकांचा कितीतरी वेळ वाचत होता, तो यापुढे वाया जाणार आहे. आजकाल बँक व्यवहाराकडे बघितले तर बँकेत फारशी गर्दी दिसत नाही, रोखीचे व्यवहार फार कमी झालेले आहेत. आता यूपीआय जनतेच्या अंगवळणी पडल्यानंतर सरकारने हे शुल्कलकाष्ठ जनतेच्या मागे लावलेले आहे. पूर्वी इंग्रजांनी आपल्या मळ्यातील चहा विकण्यासाठी बाजाराबाजारात जाऊन फुकट चहा देण्याचा कार्यक्रम केला होता. त्या काळात आणि आजही इंग्रजांनी चहात दुधाचा वापर केल्याचे आढळत नाही, कारण ते दुधाचा वापर चहात करत नाहीत. भारतात दुधाशिवाय चहा लोकप्रिय होणार नाही म्हणून दुधाचा चहा पाजण्याचे पुण्यकर्म तेव्हाच्या सरकारने केले होते. आता घरापासून गल्लीपर्यंत आणि गल्लीपासून दिल्लीपर्यंत दुधाच्या चहाशिवाय भारतीय जनतेचे पान हलत नाही. अगदी त्याचप्रमाणे आपल्या मायबाप सरकारने काही वर्षे विनाशुल्क यूपीआय द्वारे पैसे पाठवण्याची सुविधा दिली. आता तर जनतेला सवय जडलेली आहे आणि ही सवय प्रत्येकाच्या आयुष्यात पक्की झालेली आहे. काही अलते-भलते सोडल्यास बहुसंख्य जनता झक मारून हा व्यवहार करेलच आणि सरकारचे खिसे भरभरून भरेलच, याचा सरकारला पक्का विश्वास आहे. सध्याच्या काळात बरीच मंडळी चहाचे बीलही यूपीआय पद्धतीनेच देतात, त्यासोबत इतर कितीतरी देयके याच पद्धतीने देण्यात येतात. त्यामध्ये विमा, पेट्रोल, मोबाईल रिचार्ज, वाहनांचे हप्ते, ऑनलाईन खरेदी वगैरे सारख्या सेवांसाठी यूपीआय द्वारेच बिल अदा केले जाते. सरकारने कितीही खुलासे केले तरी सायबर सुरक्षेच्या नावाखाली अनेक धोके दर्शवले तरी हे खुलासे जनतेला पटण्यासारखे नाहीत. सरकारने सामान्य जनतेकडून हे शुल्क वसूल करण्यात येणार नाही असेही जाहीर केलेले आहे, ते शुल्क ज्याला आपण पैसे पाठवतो तो व्यापारी किंवा ती आस्थापना देणार आहे. आता तुम्हीच सांगा, असा कोणता दानशूर व्यापारी आहे जो परोपकारासाठी हा खर्च करेल. तुम्ही कितीही खुलासे केले तरी त्यामुळे जनतेचे समाधान होईल असे वाटत नाही. सरकारला याबाबतीत पुनर्विचार करण्याचे सल्ले देण्यात येत आहेत पण सरकारला 22 हजार कोटी कर्जाचे प्रकरण सहा हजार कोटी रुपयांत गुंडाळावे लागते, त्यासाठी देशातील 150 कोटी जनतेच्या खिशातून थोडा बहुत खर्च झाला तर ती देशभक्तीच आहे. असेच सरकार म्हणेल तसेही आपल्या सरकारचे एक धोरणच आहे, या धोरणात फुकटेगिरी करण्यासाठी काही बाबतीत फुकटाचे व्यवहार सामान्य माणसाला करता येणार नाहीत हे साधे ब्रह्मवाक्य आहे. आपल्याला जो लहान-सहान खर्च वाटतो त्यामुळे महिन्याला अब्जावधी रुपये सरकारी तिजोरीत जमा होणार आहेत. अर्थात हे सुद्धा देशभक्तीचे लक्षण समजून जनतेने सहकार्य करावे असेच सरकारकडून पुन्हा पुन्हा सांगण्यात येईल. पुढे आणखी कशाकशावर आणि कसेकसे शुल्क लागेल, याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एखादी समिती नेमावी. म्हणजे बड्याबड्या कर्जबुडव्यांना आणखी मोकाट रान मिळेल, याबाबत आणखी काय लिहावे!

सणांची चाहूल, झेंडू भाव खाणार !

● वसई ग्रामीण शेतकऱ्यांची शेकडो एकरवर झेंडूची लागवड ● व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांकडे आगाऊ मागणी



विशेष प्रतिनिधी

वसई: गणेशोत्सवामुळे फुलांच्या मागणीत वाढ झालेली असतानाच आता नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीचे वेध लागल्याने वसईच्या ग्रामीण भागातील झेंडू उत्पादक शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आगामी सणांसाठी मोठ्या प्रमाणात फुलांची गरज भासणार असल्याने काही व्यापाऱ्यांनी आतापासूनच शेतकऱ्यांकडे झेंडूच्या फुलांसाठी आगाऊ मागणी नोंदविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ग्रामीण पट्ट्यातील झेंडूची शेती सध्या चांगलीच बहरताना दिसत आहे. वसईच्या पूर्वेकडील ग्रामीण भागात भातशेतीबरोबरच गेल्या काही वर्षांत फुलशेतीकडेही शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. कमी कालावधीत उत्पादन मिळत असल्याने आणि सणासुदीच्या काळात हमखास मागणी निर्माण होत असल्याने अनेक शेतकरी झेंडू लागवडीला पसंती देत आहेत. यंदाही ग्रामीण भागात शेकडो एकर क्षेत्रावर झेंडूची लागवड करण्यात आली असून सणांचा हंगाम लक्षात घेऊन उत्पादन बाजारात आणण्याचे नियोजन शेतकऱ्यांकडून केले जात आहे.

सध्या गणेशोत्सवामुळे पूजा, आरास, मंदिरांची सजावट तसेच हारांसाठी झेंडूच्या फुलांची मागणी आहे. गणेशोत्सव संपताच सर्वपीत्री अमावस्या त्यानंतर नवरात्रोत्सवाची लगबग सुरू होणार असून त्यानंतर दसरा आणि दिवाळी हे मोठे सण येणार आहेत. विशेषतः नवरात्रोत्सवातील देवीची सजावट, दसऱ्याच्या दिवशी घरे व व्यावसायिक आस्थापनांची सजावट तसेच दिवाळीत पूजा आणि तोरणांसाठी झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे पुढील काही आठवडे झेंडू उत्पादकांसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.



भाव मिळण्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष

घाऊक बाजारातील आवक आणि मागणीनुसार झेंडूच्या दरात सातत्याने चढ-उतार होत असतात. सध्या बाजारात फुलांच्या दर्जानुसार वेगवेगळे दर मिळत असून सणांच्या दिवसांत आवक कमी आणि मागणी जास्त राहिल्यास भाव वधारण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यापारीही स्थानिक शेतकऱ्यांच्या संपर्कात असून काही ठिकाणी आगाऊ मालाची मागणी केली जात असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. किरकोळ बाजारातही झेंडूच्या फुलांसह तयार हारांच्या विक्रीला वेग आला आहे. फुलांचा दर्जा, हाराचा आकार आणि त्या दिवसाची बाजारातील आवक यानुसार दर ठरत आहेत. नवरात्र आणि दसऱ्याच्या काळात या मागणीत आणखी वाढ होण्याची अपेक्षा विक्रेत्यांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र झेंडू उत्पादकांचे आर्थिक गणित केवळ सणांच्या मागणीवर नव्हे तर पाऊस, हवामान, फुलांचा दर्जा आणि बाजारात एकाच वेळी होणारी आवक यावरही अवलंबून असते. त्यामुळे आता नवरात्र, दसरा आणि दिवाळीच्या बाजाराकडे स्थानिक झेंडू उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

अनंत चतुर्दशीसाठी महापालिका-पोलीस यंत्रणा सज्ज

१२८ कृत्रिम तलावांची व्यवस्था:
विसर्जनस्थळांवर कडेकोट बंदोबस्त



विशेष प्रतिनिधी

वसई: अनंत चतुर्दशीनिमित्त शुक्रवारी (दि. २५) होणाऱ्या गणेशमूर्तींच्या अंतिम विसर्जनासाठी वसई-विरार महापालिका आणि पोलीस प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. शहरातील प्रमुख विसर्जनस्थळे, मिरवणूक मार्ग आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष व्यवस्था करण्यात आली असून कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणासाठी मोठा पोलीस फौजफाटा तैनात केला जाणार आहे.

वसई-विरार शहरात यंदा ३६ हजारांहून अधिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्यापैकी दीड, अडीच, पाच, सहा आणि सात दिवसांच्या गणेशमूर्तींचे टप्प्याटप्प्याने विसर्जन झाले आहे. गौरींचेही भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले आहे. आता अनंत चतुर्दशीला उर्वरित गणरायांना निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक विसर्जनस्थळी दाखल होणार असल्याने प्रशासनाने यंत्रणा सज्ज ठेवली आहे. पर्यावरणपूरक विसर्जनाला प्राधान्य देत महापालिकेने शहरातील विविध भागांत १२८ कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे. यापूर्वीच्या विसर्जनादरम्यान अनेक भाविकांनी कृत्रिम तलावांचा वापर केला होता. अनंत चतुर्दशीलाही शक्य असेल तेथे कृत्रिम तलावांतच मूर्ती विसर्जित करून पर्यावरण संवर्धनाला हातभार लावावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मोठ्या आकाराच्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन करणे शक्य नसल्याने अशा मूर्तींसाठी समुद्रकिनारे, खदानी, नद्या आणि अन्य पारंपरिक विसर्जनस्थळांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. पारंपरिक ठिकाणी विसर्जन करण्याची मागणी असलेल्या नागरिकांशी संवाद साधून कोणताही वाद निर्माण होऊ नये, यासाठीही प्रशासनाकडून समन्वय साधला जात आहे.

१,२०० हून अधिक सुरक्षाकर्मी तैनात

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या झोन २ आणि ३ अंतर्गत विसर्जन बंदोबस्तासाठी २ पोलीस उपायुक्त, ५ सहाय्यक पोलीस आयुक्त, १२५ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक तसेच ८९३ पोलीस अंमलदार तैनात राहणार आहेत. त्यांच्यासोबत महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १२३ जवान, १२० होमगार्ड आणि एसआरपीएफच्या २ प्लाटूनचाही बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. अनंत चतुर्दशीला शहरातील विविध भागांतून मोठ्या विसर्जन मिरवणुका निघणार असल्याने प्रमुख रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची अतिरिक्त कुमक तैनात केली जाणार आहे. विसर्जनस्थळांवर होणारी गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेऊन वाहतूक नियोजनावरही विशेष भर देण्यात आला आहे.

कोपरीच्या घटनेनंतर विशेष खबरदारी

दीड दिवसाच्या गणेश विसर्जनावेळी विरार पूर्वेतील कोपरी येथे पारंपरिक तलावात विसर्जन करण्याच्या मुद्द्यावरून स्थानिक ग्रामस्थ आणि प्रशासनात वाद झाला होता. यावेळी धक्काबुक्कीचा प्रकार घडला होता आणि त्यानंतर स्थानिकांनी तलावाचे प्रवेशद्वार उघडून तेथे गणेशमूर्तींचे विसर्जन केले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अनंत चतुर्दशीच्या विसर्जनावेळी अशा प्रकाराची अन्यत्र पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. भाविकांशी समन्वय राखत विसर्जन मिरवणुका शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

निरोगी आरोग्यासाठी आपल्या शरीराला विविध व्हिटॅमिन्स, कॅल्शिअमची गरज असते. त्यापैकी व्हिटॅमिन बी-१२ हे शरीरासाठी एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे, जे शरीरातील लाल रक्तपेशी तयार करण्यास, मज्जातंतूंचे आरोग्य आणि शरीरात ऊर्जा निर्माण करण्यास मदत करते. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा, मुंग्या येणे आणि कमकुवत स्मरणशक्ती यासारख्या समस्या उद्भवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन बी-१२ ची कमतरता चांगला आहार आणि निरोगी अन्नाच्या संयोजनाने सहजपणे भरून काढता येते.



व्हिटॅमिन बी-१२ ची कमतरता अशी करा कमी

व्हिटॅमिन बी-१२ शरीरात रक्त निर्मिती आणि डीएनए वाढण्यास मदत करते. हे तंत्रिका पेशींचे संरक्षण करते. त्याच्या कमतरतेमुळे अशक्तपणा, पेशींचे नुकसान, थकवा, हात आणि पाय सुन्न होणे आणि स्मृतिभ्रंश यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. शाकाहार करणाऱ्यांना बहुतेक वेळा याच्या कमतरतेचा धोका असतो, कारण ते मुख्यतः मांस, मासे, अंडी आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळते. अंडी देखील व्हिटॅमिन बी-१२ चा चांगला स्रोत आहे. विशेषतः त्याचा पिवळा भाग बी-१२ ने भरलेला असतो. पण जर तुम्ही अशा लोकांपैकी असाल, ज्यांना शरीरातील या जीवनसत्वाची कमतरता लवकरात लवकर दूर करायची असेल तर ते अंड्यांसोबत इतर काही गोष्टी खाऊ शकतात. अंड्यांचे हे निरोगी मिश्रण तुमच्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरेल.

दुग्धजन्य पदार्थ- अंड्यांसोबत दूध, दही किंवा चीज खाल्ल्याने शरीराला अतिरिक्त कॅल्शियम आणि बी-१२ मिळतात. हे आरोग्यदायी मिश्रण तुम्ही नाश्त्यात खाऊ शकता. अंडी आणि दूध मिसळून हेल्दी पॅनकेक्स बनवता येतात.



मासे आणि चिकन- जे लोक नॉनव्हेज खातात ते अंडी खातच असतील. पण हे लोक अंड्यांसोबत सॅल्मन, ट्यूना किंवा चिकनसारखे इतर मांसाहारी पदार्थही घेऊ शकतात. यामुळे तुमच्या शरीराला व्हिटॅमिन बी-१२ आणि प्रोटीन दोन्ही मिळतील. अंडी तुम्ही चिकन सूपमध्ये मिसळून खाऊ शकता.



हिरव्या पालेभाज्या- अंड्यांसह पालकाचे सेवन केल्याने शरीराला लोह आणि फॉलिक ॲसिड मिळते, जे व्हिटॅमिन बी-१२ शोषण्यास मदत करते. तुम्ही स्क्रॅम्बल्ड अंडी किंवा ऑम्लेट सोबत पालक खाऊ शकता.



मशरूम- मशरूम व्हिटॅमिन डीचा स्त्रोत आहे, जो शरीरात व्हिटॅमिन बी-१२ चा विकास वाढवण्यास मदत करतो. अंडी आणि मशरूम ऑम्लेट किंवा भुर्जी हा एक चवदार आणि पौष्टिकतेने भरलेला पर्याय आहे, जो नियमितपणे खाल्ल्यास शरीराला पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन बी-१२ प्रदान करू शकतो.



फोर्टिफाइड तृणधान्ये आणि नट- फोर्टिफाइड तृणधान्ये, सोया दूध आणि अक्रोड आणि बदाम यांसारख्या सुक्या मेव्यासह अंडी खाल्ल्याने तुम्हाला व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेवर मात करण्यास मदत होईल. उकडलेल्या अंड्यांसोबत भिजवलेले काजू तुम्ही नाश्त्यात घेऊ शकता. लक्षात ठेवा, ज्या लोकांना व्हिटॅमिन बी-१२ ची तीव्र कमतरता आहे ते डॉक्टरांच्या सल्ल्याने बी-१२ सप्लिमेंट घेऊ शकतात.



व्हिटॅमिन बी-१२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा, मुंग्या येणे आणि कमकुवत स्मरणशक्ती यासारख्या समस्या उद्भवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन बी-१२ ची कमतरता चांगला आहार आणि निरोगी अन्नाच्या संयोजनाने सहजपणे भरून काढता येते.

स्वयंपाकघरातील उपयोगी टिप्स

- ✓ कोथिंबीर जास्त काळ टिकण्यासाठी ती निवडून मऊ कापडात अथवा कागदात गुंडाळून ठेवा.
- ✓ गोड पदार्थांसाठी बदाम चिरून टाकायचे असतील तर आधी ते पाण्यात भिजत ठेवा. ज्यामुळे ते सोलणे आणि चिरणे सोपे जाईल.
- ✓ लाकडी चॉपिंग बोर्ड वापरल्यास फळं आणि भाज्या चिरताना चाकूची धार कमी होत नाही.
- ✓ सुकमेवा चॉप करताना तो काही तास फ्रिजमध्ये ठेवा आणि चाकू गरम पाण्याने धुवून घ्या.
- ✓ भजी करताना बॅटरमध्ये थोडं गरम तेलाचे मोहन आणि बेकिंग सोडा मिसळा.
- ✓ तळलेले पदार्थ तेल निथळण्यासाठी न्यूज पेपरमध्ये काढून ठेवू नका, यासाठी टीश्यू पेपर अथवा कोरा पेपर वापरा.



मालक, मुद्रक व प्रकाशक - श्री.प्रकाश संपत अरगडे यांनी एस.आर. प्रकाशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन क्र.8,9,10, घरटनपाडा जवळ, वैशाली नगर शेवटचा बस स्टॉप, दहिसर पूर्व, मुंबई-400067 येथे छापून 5, शेख समारू चाळ, एस.एन. दुबे रोड, यादव नगरच्या मागे, चुनाभट्टी, राज मेडिकल जवळ, दहिसर पूर्व, मुंबई उपनगर 400 068 (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक- श्री.प्रकाश संपत अरगडे PRGI NO- MAHMAR/26/A7292 Mob- 8169733504, सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.